**गट विमा प्रकरण निकाली काढतांना ध्यावयाच्या दक्षतेबाबत .**

वाचा-१.शासन निर्णय ग्रामविकास विभाग डीओआय-२०८१/७०१/एडीएम-५ दि.२६.०४.१९८२.
२. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.विमा १०९०/प्र.क्र.२८०/१८ दि.०१.०९.१९९०.
३. शासन निर्णय क्र.ग्रामविकास व जलसंधारण विभाग विमा-२०२२/प्र.क्र.१३६/आस्था-५ दि.१९.०६.२००३
४. शासन निर्णय क्र.ग्रामविकास व जलसंधारण विभाग विमा-२०१०/प्र.क्र.१९६/आस्था-५ दि.०६.०१.२०११
५. शासन निर्णय क्र.ग्रामविकास विभाग गवियो-२०१६ /प्र.क्र.४९/आस्था-५ दि.१६.०१.२०२०.

**कार्यालयीन परिपत्रक**
**वित्त विभाग, जिल्हा परिषद अमरावती**
**क्रजिप/वित्त/गवियो/2563/२०२२ दिनांक. 13/06/2022**

उपरोकत शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात यावे. गट विमा वर्गणी कपात नोंद वरिल शासन निर्णया नुसार सर्व कर्मचा-यांचे सेवापुस्कात घेणे आश्यक असतांना तशी नोंद घेवुन कार्यालय प्रमुखाने संपुर्ण गट विमा प्रस्ताव खाते प्रमुखांकडे नोंदी घेवुनच व इतर आवश्यक दस्ताऐवज तपासणी सुचीनुसार तयार करुन त्वरीत सादर करणे आवश्यक असतांना कार्यालय प्रमुख व खाते प्रमुख गट विमा प्रकरणाशी संबंधीत तपासणी सुचीचे अवलोकन न करता आपले स्तरावरुन प्रस्ताव या विभागात मंजुरीस्तव सादर करित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब हि अत्यंत गंभीर असुन प्रशासनिक दृष्टया सर्वथा अनुचीत आहे.करिता आवश्यक दस्ताऐवज तथा तपासणी सुची शासन निर्णय व नोंद कशी घेण्यात यावी याबाबतचा नमुना जिल्हा परिषद अमरावती यांचे संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार संपुर्ण कागदपत्रे तयार करुन व वरिल शासन निर्णया नुसार नोंदी घेवुन गट विमा प्रकरण अंतिम मंजुरीस्तव या कार्यालयात सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.जेणेकरुन सेवानिवृत्त / मयत झालेल्या कर्मचा-यांना गट विमा रक्कम वेळेत अदा करणे शक्य होईल.

सदर परिपत्रकाचे अनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुख तथा खाते प्रमुख यांना सुचीत करण्यात येते की, त्यांनी आपले स्तरावरुन गट विमा प्रकरणे सादर करतांना तपासणी सुचीप्रमाणे आवश्यक असलेले दस्तऐवज तपासुन त्यावर आवश्यक त्या ठिकाणी कार्यालय प्रमुख व खाते प्रमुख यांच्या स्वाक्ष-या शिक्यानिशी घेवुनच परिपुर्ण प्रस्ताव मंजुरीस्तव या विभागात सादर करावा. तसेच गट विमा प्रकरण मंजुर करीत असतांना उपरोक्त नमुद सर्व शासन निर्णयाचे सखोल वाचन करुन आवश्यक दस्तऐवजासह प्रकरणे सादर करावी. गट विमा देयक तयार करतांना शासन नियमा प्रमाणे संबंधीत कर्मचा-याला देय होणा-या रकमेची गणना अचुक करुन देयके सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.तसेच सर्व खातेप्रमुखांनी गट विमा नोंदवही तयार करुन त्यामध्ये नोंद घेवुन मंजुर झालेल्या प्रकरणांचा ताळमेळ दरमाह वित्त विभागाशी घेण्यात यावा.

(चंद्रशेखर खंडारे)
**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रतिलीपी-**१.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२.खातेप्रमुख (सर्व)/कार्यालय प्रमुख (सर्व) ------------------------ यांना
सुचीत करण्यात येते की, त्यांनी वरिल परिपत्रकाचे व शासन निर्णयाचे अवलोकन करुन परिपुर्ण गट विमा प्रकरणे मंजुरीस्तव सादर करण्याची दक्षता घ्यावी .

(चंद्रशेखर खंडारे)
**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**